

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

विवेकानंद कॉलेज
(स्वायत्त) कोल्हापूर

## इतिहास विभाग

## सूचना - ICT द्वारे अध्यापन

२०/१/२०२६

इतिहास विभागातील यु.जी. व पी.जी. च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शुक्रवार दिनांक २३ जानेवारी,२०२६ रोजी इतिहास विभागामार्फत "सुलतानशाहीचा इतिहास II" या विषयांतर्गत "विजयनगर काळातील स्थापत्य शैली" या घटकाचा ICT (माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान) च्या माध्यमातून अभ्यास करण्यात येणार आहे. दिनांक २३ जानेवारी,१५६५ रोजी झालेल्या तालिकोटाचे युद्ध (Battle of Talikota) या ऐतिहासिक घटनेला यावर्षी ४६१ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने या सत्रामध्ये विजयनगर साम्राज्यातील कला व स्थापत्य शैलीचा विशेष आढावा घेण्यात येणार आहे.

तरी सर्व विद्यार्थ्यांनी दुपारी ११.०० वाजता रूम क्रमांक २१४ मध्ये वेळेवर उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांनी विषयाची पूर्वतयारी करून येणे अपेक्षित आहे.

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## इतिहास विभाग

### अहवाल : ICT द्वारे अध्यापन

२८/१/२०२६

इतिहास विभागामार्फत यु.जी. व पी.जी. विद्यार्थ्यांसाठी "सुलतानशाहीचा इतिहास II" या विषयांतर्गत "विजयनगर काळातील स्थापत्य शैली" या घटकावर आधारित ICT द्वारे अध्यापन सत्र शुक्रवार दिनांक २३/१/२०२६ रोजी रूम क्रमांक २१४ येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले. दिनांक २३ जानेवारी १५६५ रोजी झालेल्या तालिकोटाचे युद्ध (Battle of Talikota) या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ या सत्रामध्ये विजयनगर साम्राज्यातील कला व स्थापत्य शैलीचा विशेष आढावा घेण्यात आला. या सत्रात विद्यार्थ्यांना विजयनगरकालीन मंदिरे, राजवाडे, बाजारपेठा, स्तंभशैली, कोरीवकाम तसेच वास्तुशिल्पातील वैशिष्ट्ये यांची सविस्तर माहिती देण्यात आली. सत्राचे विशेष आकर्षण म्हणजे विजयनगर साम्राज्याचा आभासी (Virtual) फेरफटका विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्या काळातील वास्तू प्रत्यक्ष पाहिल्याचा अनुभव मिळाला. तसेच विजयनगर साम्राज्यावर आधारित माहितीपट (Documentary) सुद्धा विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. या माहितीपटाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनाचे चित्र स्पष्टपणे समजले. या ICT आधारित अध्यापनामुळे विद्यार्थ्यांना इतिहास अधिक रंजक, दृश्यात्मक व अनुभवाधारित पद्धतीने समजून घेता आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून सत्राचा लाभ घेतला.

संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व ज्ञानवर्धक वातावरणात पार पडला. अशा प्रकारे हे अध्यापन सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त, नाविन्यपूर्ण व प्रेरणादायी ठरले.

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# Use of ICT -२३ जानेवारी,२०२६

## “विजयनगर काळातील स्थापत्य शैली”





